श्री.एकनाथराव खडसे...

विधान सभेचे माजी उपाध्यक्ष आदरणीय श्री. प्रमोद भाऊरावजी शेंडे यांचा जन्म दिनांक 6 एप्रिल, 1940 रोजी धुळे येथे झाला. विद्यार्थी जीवनापासून त्यांना समाजकार्यात रस होता. नागपूर विद्यापीठ विद्यार्थी संघाचे अध्यक्ष पद त्यांनी भूषविले होते. त्यानंतर त्यांनी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेत शैक्षणिक, सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम केले. शेतात मोलमजुरी करणाऱ्या महिलांसाठी महिला ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून 100 टक्के अनुदानावर गायींचे वाटप करून काऊ बँक ही अभिनव योजना त्यांनी सुरू केली होती. या योजनेचा परिणाम तळागातील थेट जनतेवर होऊन त्यांच्या जीवनावर पडला. श्री.शेंडे यांनी वर्धा मतदार संघातून सुमारे 25 वर्ष विधान सभेत प्रतिनिधीत्व केले. जून 1988 ते मार्च 1990 या काळात कृषी राज्यमंत्री म्हणून त्यांनी समर्थपणे जबाबदारी पार पाडली. डिसेंबर 1999 ते ऑक्टोबर 2004, डिसेंबर 2004 ते 2009 या कालावधीत ते विधान सभेचे उपाध्यक्ष होते. विधान सभेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य आपल्या सर्वांच्या स्मरणात कायम राहील. झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काने पट्टे देण्याचा प्रश्न त्यांच्या नेतृत्त्वातील विधान सभा विनंती अर्ज समितीने मार्गी लावला. विविध समितीचे प्रमुख म्हणूनही त्यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने काम पाहिले. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील दुवा म्हणून त्यांनी केलेले कार्य कायम लक्षात राहील. समन्वयाचा आदर्श त्यांनी आपल्या नेतृत्त्वातून उभा केला होता याचा मला आवर्जून उल्लेख करावा लागेल. अशा या समन्वयी नेतृत्त्वाचे दिनांक 14 नोव्हेंबर 2015 रोजी दु:खद निधन झाले.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

कै. मदन विश्वनाथराव पाटील यांचा जन्म दिनांक 2 डिसेंबर, 1960 रोजी सांगली येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.कॉम. पर्यंत झाले होते.

कै. पाटील यांनी सांगली येथील वसंतदादा दंत महाविद्यालयाचे चेअरमन, विश्व-विजय शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, शिवाजीनगर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, वसंतदादा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे अध्यक्ष, वसंतदादा विकास प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष, शिवशक्ती व्यायाम मंडळाचे अध्यक्ष, विश्वनाथराव शामराव पाटील ट्रस्टचे संस्थापक-अध्यक्ष, वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेचे चेअरमन, सांगली जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य, सांगली जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष, वसंत स्फूर्ती क्रीडा मंडळाचे संस्थापक, महाराष्ट्र राज्य भू विकास बँकेचे अध्यक्ष, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक, सांगली जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य, दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशनचे अध्यक्ष तसेच वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणूनही उत्तम कार्य केले होते. सांगली जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै.पाटील यांनी सांगली जिल्हा परिषदेचे सदस्य, सांगली नगरपालिकेचे नगरसेवक तर काही काळ नगराध्यक्ष पदही त्यांनी भूषविले होते. त्यांनी 2013-2014 मध्ये उर्वरित महाराष्ट्र वैधानिक मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्य केले होते. सांगली शहराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

कै. पाटील 1996 व 1998 असे दोन वेळा सांगली मतदारसंघातून लोकसभेवर निर्वाचित झाले होते. सन 2000 मध्ये सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर तर सन 2004 मध्ये सांगली मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवरही निर्वाचित झाले होते. त्यांनी डिसेंबर 2008 ते नोव्हेंबर 2009 या कालावधीत महाराष्ट्र राज्याचे महिला व बालविकास आणि पणन खात्याचे मंत्री म्हणून उत्तम कार्य केले होते.

अशा या उमद्या अभ्यासू नेत्याचे शुक्रवार, दिनांक 16 ऑक्टोबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे....

कै. सदाशिव आबाजी पोळ यांचा जन्म दिनांक 1 जून, 1945 रोजी सातारा जिल्ह्यात माण तालुक्यातील इजंबाव येथे झाला. त्यांचे शिक्षण एफ.वाय.बी.एस्सी. (ॲग्री) पर्यंत झाले होते.

कै. पोळ यांनी शिंगणापूर येथील पंचक्रोशी शिक्षण मंडळाचे चेअरमन, मार्डी येथील आबासाहेब पोळ शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष, दहिवडी येथील साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, मार्डी येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे 42 वर्षे संचालक तर काही काळ अध्यक्ष तसेच माण तालुका खरेदी विक्रीसंघाचे चेअरमन, भूविकास बँक सातारा संचालक, माण तालुका सहकारी सूतगिरणीचे संस्थापक-चेअरमन म्हणूनही उत्तम कार्य केले होते. सतत दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या माण तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते. माण तालुक्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.

कै. पोळ सन 1967-72 मार्डी ग्रामपंचायतीचे सदस्य, 1967-79 व 1989-1996 माण तालुका पंचायत समितीचे सभापती, 1967-2002 सदस्य व 1998-99 मध्ये सातारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. माण तालुक्याचे अग्रणी नेते अशीच त्यांची प्रतिमा होती.

कै.पोळ सन 2002 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. एक कार्यक्षम व अभ्यासू लोकप्रतिनिधी अशीच त्यांची ओळख होती.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे बुधवार, दिनांक 30 सप्टेंबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

या सर्व सन्माननीय सदस्यांच्या दु:खद निधनानिमित्त मी शोक व्यक्त करतो.

......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, या सदनामध्ये मान्यवरांच्या निधनाबद्दल या सभागृहाचे नेते सन्माननीय श्री.एकनाथ खडसे साहेबांनी शोक प्रस्ताव मांडला आहे. त्यावर शोक व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एअर चीफ मार्शल श्री.ओम प्रकाश मेहरा साहेबांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाने आपण कुशल प्रशासक, निडर सैनिक, उत्कृष्ट क्रीडा संघटक, सच्चा देशभक्त, भारतमातेचा महान सुपुत्र गमावला आहे. सर्वप्रथम मी त्यांना भावपूर्ण आदरांजली अपर्ण करतो.

भारतीय हवाई दलातील अधिकारी पदापासून सुरूवात करून महाराष्ट्र-राजस्थानच्या राज्यपालपदांपर्यंत त्यांनी विविध पदांवर काम केले. सोपविण्यात आलेली प्रत्येक जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. ज्या ज्या पदांवर त्यांनी काम केले त्या प्रत्येक पदाला त्यांनी न्याय दिलाच, पण त्याच बरोबर त्या पदांना सन्मानही प्राप्त करून दिला.

हवाई दलातून निवृत्त झाल्यानंतर, पुढच्याच वर्षी म्हणजे सन 1977 मध्ये त्यांना पद्मविभूषण किताबाने सन्मानीत करण्यात आले. मेहरा ऑलिम्पिक असोसिएशन आणि आशियाई खेळ महासंघ या संघटनांचे ते प्रमुख होते. अगदी अलीकडे 2012 मध्ये त्यांना लाहोरच्या पंजाब विद्यापीठाने सर्वात ज्येष्ठ माजी विद्यार्थी म्हणून त्यांचा सत्कार करण्याचे ठरविले होते. तसे निमंत्रणही त्यांना आले होते. प्रकृतीच्या कारणास्तव ते जाऊ शकले नाहीत याची त्यांच्या मनात नक्की खंत होती.

श्री.मेहरा साहेबांनी 1980 ते 1982 या काळात महाराष्ट्राचे राज्यपालपद भूषविले. स्वर्गीय अंतुले साहेब त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर 1985 पर्यंत राजस्थानचे राज्यपाल म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. अलीकडेच वयाच्या 96 व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

श्री.मेहरा साहेब एक आदर्श जीवन जगले. त्यांच्या जीवनात संघर्ष होता, शौर्य होते, रोमांच होता, यश होते, मान-सन्मान होता, लोकांचे प्रेम आणि आदरही होता. त्यांचे जीवन हे देशप्रेमाने ओतप्रोत भरलेले होते. अशा या महान देशभक्ताच्या निधनाबद्दल मी विरोधी पक्ष नेता म्हणून सर्व विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या वतीने भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

प्रा.राम कापसे साहेबांचेही नुकतेच निधन झाले. मी त्यांना सुद्धा भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

सामान्य कार्यकर्त्यांपासून सुरूवात करून अंदमान-निकोबारच्या राज्यपालपदापर्यंतची त्यांची वाटचाल ही सर्वांसाठी अनुकरणीय आणि मार्गदर्शक आहे. कल्याण नगरपरिषदेच्या नगरसेवक पदापासून त्यांनी सुरूवात केली. महाराष्ट्र विधान सभेचे आमदार, लोकसभेत व राज्यसभेत खासदार असा प्रवास करीत अंदमान-निकोबारच्या नायब राज्यपाल पदापर्यंत ते पोहोचले. दरम्यानच्या काळात सामाजिक संस्था, संघटनांमध्येही अनेक पदांवर त्यांनी काम केले. परंतु, पदांची लालसा कधीच ठेवली नाही. नि:स्वार्थीपणे काम करत राहणे, मिळालेल्या संधीचे सोने करणे, जनतेसाठी झटणे, हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते.

प्रा.कापसे साहेबांचा जन्म 1933 साली ठाणे जिल्ह्यातील जव्हार येथे झाला. 1959 ते 1993 या काळात त्यांनी रूपारेल महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले. त्यानंतर ते राजकारणात सक्रीय झाले. विद्यार्थीप्रिय प्राध्यापक असल्याने त्यांना विद्यार्थ्यांचे, युवकांचे सतत प्रेम मिळाले. ते उत्कृष्ट संसदपटू, कुशल संघटक होते. मनमिळावू स्वभावाचे नेते होते. त्यामुळे लोकांमध्ये प्रिय होते. प्रामाणिक राजकारणी ही त्यांची विशेष ओळख होती. कल्याण नगर परिषदेच्या नगरसेवक पदापासून अंदमान-निकोबारच्या नायब राज्यपाल पदापर्यंतचा त्यांचा प्रवास खडतर, तितकाच संघर्षमय होता.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे......

ठाण्याच्या ग्रामीण भागात काम करत त्यांनी आपली राजकीय आणि सामाजिक कारकीर्द घडवली. जनतेशी थेट संपर्क ठेवणाऱ्या नेत्यांपैकी ते एक होते. आपल्या अफाट जनसंपर्काच्या बळावर 1989 ते 1996 या काळात ते ठाणे लोकसभा मतदारसंघातून निवडून आले होते. यानंतर त्यांना राज्यसभेत संधी मिळाली होती.

मुंबईला नोकरी-व्यवसायानिमित्त जाणाऱ्या डोंबिवलीकरांसाठी स्वतंत्र लोकल सुरु करण्याचा विषय असू दे की, अंदमानातील त्सुनामीग्रस्तांना मदत करण्याचा मुद्दा असू दे, कापसे साहेब सगळयाच विषयांना तितक्याच तडफेने भिडायचे आणि तो सोडवण्याचा प्रयत्न करायचे.

त्यांच्या निधनाने एक आदर्श राजकारणी, सेवाभावी, समाजकारणी, ध्येयनिष्ठ कार्यकर्ता आपण गमावला आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, मी त्यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, डॉ.कै.सय्यद अहमद हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, राज्याचे माजी मंत्री, मणिपूरचे राज्यपाल डॉ.सैय्यद अहमद यांचे अलिकडे दु:खद निधन झाले. मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. त्यांच्या निधनाने राज्याची तसेच देशाची सर्वधर्मसमभावाच्या चळवळीची फार मोठी हानी झाली आहे.

डॉ.अहमद यांनी हिंदू-मुस्लीम ऐक्य आणि सर्वधर्म समभावाच्या प्रसारासाठी जीवनभर कार्य केले होते. सर्व धर्माच्या लोकांनी परस्परांचा आदर, सन्मान केला, तरच देशाची प्रगती शक्य आहे, ही त्यांची ठाम धारणा होती. याच धारणेतून त्यांची सामाजिक व राजकीय वाटचाल झाली.

देशाच्या प्रगतीमध्ये अल्पसंख्याक समाजाचा मुख्य वाटा असला पाहिजे, त्यासाठी या समाजात शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले होते. त्यांचे नेतृत्व हे अल्पसंख्याक समाजातून आलेले, पुरोगामी, पग्रतशील विचारांचे नेतृत्व होते.

डॉ.सय्यद अहमद हे राज्यातीलच नव्हे तर देशातील अभ्यासू, सुसंस्कृत नेत्यांपैकी ते एक होते. ते स्वत: अनेक भाषांचे जाणकार होते. मराठी, हिंदी, इंग्रजी, अरबी, पार्शियन अशा विविध भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. यातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक दबदबा या राज्यात आणि देशात निर्माण झाला होता.

...2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे......

मुंबईतील नागपाडा मतदारसंघातून ते पाच वेळा विधानसभेवर निवडून आले होते यावरुन त्यांच्या लोकप्रियतेची कल्पना येऊ शकेल. महाराष्ट्र विधानसभेत अनेक वर्ष सदस्य व काही काळ मंत्री म्हणून काम केल्यानंतर त्यांना झारखंडचे राज्यपाल म्हणून संधी मिळाली होती. ती त्यांनी चार वर्षे सांभाळली . आता मणिपूरच्या राज्पालपदाची जबाबदारी त्यांच्याकडे होती. याच पदावर त्यांचे दु:खद निधन झाले.

त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक एकतेच्या चळवळीची हानी झाली आहे. एक दूरदृष्टीचा नेता, कुशल प्रशासक, अभ्यसू, सुसंस्कृत व्यक्तिमत्व, उत्तम शायर, असे बहुआयामी व्यक्तिमत्व आपल्यातून निधून गेले आहे.

मी दिवंगत डॉ.सय्यद अहमद यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करतो. राज्यातील व देशातील सामाजिक एकता अखंड ठेवणे, हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरणार आहे, आपण सर्वजण त्यासाठी प्रयत्न करुया.

कै.प्रमोद शेंडे हे राज्याचे ज्येष्ठ नेते, माजी राज्यमंत्री, विधानसभेचे माजी उपाध्यक्ष सन्माननीय प्रमोद शेंडे यांचेही नुकतच दुर्दैवी निधन झाले. मी त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

विदर्भाच्या आणि विशेषत: वर्धा जिल्हयाच्या विकासाची कळकळ असलेले आणि त्यासाठी तळमळीने झटणारे नेते म्हणून प्रमोद शेंडे साहेब आपल्याला परिचित होते. त्यांच्या निधनाने विदर्भाची, महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे.

वडील आमदार आणि घरच्यांची काँग्रेसची बांधिलकी अशा वातावरणात त्यांचा जन्म झाला. राजकीय पार्श्वभूमी असली तरी, त्यांनी स्वत:च्या कर्तृत्वावर राज्याच्या राजकारणात स्वत:च वेगळ स्थान निर्माण केले होते. त्यांच्या सामाजिक जीवनाची सुरुवात विद्यार्थी चळवळीतून झाली होती, पुढे युवक चळवळीच्या माध्यमातून त्यांचे नेतृत्व अधिक बहरले होते.

त्यानंतर 30 वर्षाहून अधिक काळ वर्धा जिल्हयाच्या राजकारणावर प्रमोद शेंडे साहेबांनी, त्यांच्या कार्यातून आपला प्रभाव निर्माण केला व तो कायम ठेवला. वर्धा मतदारसंघातून सहा वेळा विधानसभेवर ते निवडून आले होते. राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ जबाबदारी सांभाळली होती.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे......

महाराष्ट्र विधानसभेचे ते दोन वेळा उपाध्यक्ष होते. उपाध्यक्षपदाच्या या दहा वर्षाच्या काळातही त्यांनी विधिमंडळाच्या कामकाजात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला होता. सत्तारुढ आणि विरोधी पक्षांमध्ये समन्वय ठेवून विधिमंडळाचे कामकाज प्रभावी करण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले होते. विधिमंडळाच्या कामकाजाचा दर्जा वाढावा, प्रतिमा उंचावण्यासाठी त्यांनी उपाध्यक्ष म्हणून सातत्याने प्रयत्न केले होते.

शेंडे साहेबांच्या स्वभावाची अनेक वैशिष्ट्य या ठिकाणी सांगता येतील. त्यांचे वक्तृत्व आणि कर्तृत्वही खूप मोठे होते. लोकांवर त्यांचा प्रभाव पडायचा. प्रशासनावर घट्ट पकड असलेले ते नेते होते. ग्रामीण भागाच्या विकासात त्यांनी फार मोठी भूमिका बजावली होती.

वर्धा जिल्हयातील ग्रामीण भागातील रस्ते शहराशी जोडण्याची कामे, ग्रामपंचायत इमारती आणि पांदण रस्त्यांची कामे त्यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात झाली होती. झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे पट्टे देण्याचा विषय त्यांनी लावून धरला होता. कापूस आणि धान उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर त्यांनी सातत्याने आवाज उठवला होता. अनेक प्रश्नांना न्याय देण्याचे काम त्यांनी केले हाते. त्यांच्या निधनाने वर्ध्यासाठी, विदर्भासाठी, महाराष्ट्रासाठी तळमळीने काम करणारा नेता हरपला आहे. मी त्यांनाही या ठिकाणी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, कै.मदन पाटील हे सांगली जिल्हयातील एक उमदे नेतृत्व, माजी मंत्री मदन पाटील साहेब, यांचे अकाली झालेल निधन हे निश्चितच आपल्या सगळयांना चटका लावणारे आणि प्रचंड धक्कादायक आहे.

स्वर्गीय आर.आर.पाटील साहेबांच्या अकाली निधनानंतर, मदन पाटील साहेबांचे निधन हे सांगली जिल्हयासाठीच नव्हे, तर राज्यासाठी फार मोठा धक्का आहे. त्यांच्या निधनाने सांगली जिल्हयाचे, राज्याचे फार मोठे नुकसान झाले आहे. स्व.मदन पाटील साहेबांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

कै.मदन पाटील हे सांगलीकरांच्या लोकप्रिय नेत्यांपैकी एक होते. स्व.वसंतदादांच्या घराण्यातून आलेले, त्यांचेच नातू असल्याने सांगलीकरांचे मदन पाटील साहेबांवर विशेष प्रेम होते. खुद्द दादांच्या तालमीत तयार झालेले असल्याने त्यांच्या राजकारणाला वेगळा बाज होता.

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे......

समाजसेवेचे, लोकसेवेचे, सहकाराचे आणि राजकारणाचे धडे कुटुंबातच गिरवल्याने त्यांच्या नेतृत्वाला प्रगल्भतेचीही किनार होती.

"मै हूँ ना" या त्यांच्या शब्दांनी लोकांना धीर मिळायचा. मदन भाऊंच व्यक्तिमत्व अष्टपैलू होते. खरे तर मोठया झाडाच्या सावलीत दुसरी झाडे वाढत नाहीत, असे म्हणतात. परंतु मदनभाऊ त्याला अपवाद होते. सांगलीच्या राजकारणात त्यांचा स्वत:चा असा चाहता वर्ग आणि मित्रपरिवार होता.

सत्तेचा उपयोग लोकांसाठी, कार्यकर्त्यांसाठी करायचा, कुणाशीही कायमचे शत्रुत्व नाही, लढाईच्या मैदानात सर्वस्व पणाला लावायचे आणि सांगलीचा सर्वांगीण विकास हेच ध्येय ठेवून त्यांनी आयुष्यभर काम केले होते.

निवडणुकीच्या रणांगणात प्रसंगी त्यांनी प्रकाशबापू पाटील साहेबांशही दोन हात केले होते. पण निवडणूक संपताच कुटुंबातील ऐक्य टिकवण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता.

वसंतदादा हयात असताना विरोधकांनी सांगलीचा काँग्रेस गड हिसकावून घेतला होता. सांगलीत जनता दलाचे संभाजी पवार हे विजयी झाले होते. पण, या पराभवानंतर सांगलीची नगरपालिका आणि पुढे विधानसभा व लोकसभा जिंकून मदन पाटील यांनी आपल्या राजकीय कर्तृत्वाचा झेंडा पुन्हा उंच केला होता.

एक काळ असा होता की, मदन पाटील सांगलीचे आमदार व मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री आणि प्रतीक पाटील हे खासदार व केंद्रात मंत्री होते. महापालिका, जिल्हा बँक, साखर कारखाना या कुटुंबीयांच्या ताब्यात असे सत्तेचे, यशाचे, कर्तृत्वाचे सर्व काही यश त्यांना मिळाले होते. आज त्यांच्या सारख्या नेत्याची राज्याला गरज असताना, त्यांचे अकाली निधन झाले ही आपल्या सगळयांसाठी मोठी दु:खद घटना आहे.

मदन पाटील साहेबांची नगरपालिकेतील एन्ट्री, त्यानंतर युवक काँग्रेसचे अध्यक्षपद, पुढे नगराध्यक्षपद, दोन वेळा खासदार, दोन वेळा आमदार, विधान परिषदेवर निवड, महिला व बालकल्याण खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून काम, पक्षात बंड, आमच्या राष्ट्रवादी पक्षात प्रवेश, त्यानंतर राष्ट्रवादी सोडून जाणे, काँग्रेसचे राजकारण असे अनेक टप्पे पार करणारे मदन पाटील

...5...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे......

साहेब, हे सडेतोड आणि दिलदार लढवय्ये नेते म्हणून ते महाराष्ट्राच्या कायम लक्षात राहतील.

विधिमंडळात, संसदेत आणि मंत्रिमंडळात काम करताना त्यांनी जनसामान्यांचे प्रश्न आणि सांगलीच्या राज्याच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले होते.

आमचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आर.आर.पाटील (आबा) हे त्यांचे बालमित्र आणि जीवाभावाचे स्नेही होते. सांगलीकर हे आर.आर.पाटील साहेबांच्या अकाली निधनाच्या धक्क्यातून सावरलेले नसताना त्यातच मदन पाटील साहेबांचे झालेले निधन, हे सर्वांनाच धक्का देणारे आहे. मी त्यांना विनम्र श्रध्दांजली वाहतो.

कै.सदाशिवराव पोळ हे माजी आमदार आणि माण तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते यांच्या निधनाबद्दल मी त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो. आदरणीय पवार साहेबांच्या विचारावर निष्ठा ठेवून माणसारख्या ग्रामीण भागात तळमळीने काम करणारे नेते म्हणून पोळ साहेब आपल्या सगळयांना परिचित आहेत.

माण तालुक्याच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात त्यांचा शब्द प्रमाण मानण्याइतकी लोकप्रियता त्यांनी मिळवली होती. ही लोकप्रियता त्यांच्या प्रदीर्घ सामाजिक कार्यातून आणि लोकसंपर्कातून त्यांनी प्राप्त केली होती. माण तालुक्याचा दुष्काळ हटविण्यासाठी त्यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यांच्या पुढाकाराने तालुक्यात अनेक ठिकाणी पाझर तलाव, बंधारे, विहिरी आदिंच्या माध्यमातून त्यांनी जलसंधारणाचे मोठे काम केले होते.

माण तालुका पंचायत समितीचे सभापती म्हणून दीर्घकाळ काम करताना, त्यांनी तालुक्याच्या ग्रामीण विकासाला मोठी गती देण्याचे काम केले हाते. जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष ही पदे त्यांनी केवळ भूषवली नाहीत, तर या पदांना सर्वार्थाने न्याय दिला होता.

माण विधानसभा मतदारसंघ राखीव होता. त्याकाळी पोळ साहेब म्हणतील तो उमेदवार निवडून येणार, इतके त्यांच्या शब्दाला वजन होते.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

तालुक्यात त्यांची राजकीय ताकद होती. तालुक्याचे "किंगमेकर" म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून ते विधानपरिषदेवर निवडूनही आले होते. गेल्या काही वर्षांपासून ते आजारी होते. पोळ साहेबांच्या मृत्युच्या काही दिवस आधी आदरणीय पवार साहेबांनी मार्डी येथील त्यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. पोळ साहेबांच्या निधनाने एका व्यासंगी, संयमी, अभ्यासू नेतृत्वाला आपण मुकलो आहोत. मी त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

या सर्व मान्यवरांना त्यांच्या दु:खद निधनाबद्दल या सभागृहाचा विरोधी पक्ष नेता म्हणून सर्व विरोधी पक्षांच्या वतीने भावपूर्ण आदरांजली व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.एकनाथराव खडसे यांनी या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

कै.ओम प्रकाश मेहरा यांचा जन्म दिनांक 19 जानेवारी, 1919 रोजी लाहोर येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए.पर्यंत झाले होते.

कै.मेहरा यांनी सन 1940 मध्ये भारतीय हवाई दलाच्या सेवेत पायलट ऑफीसर म्हणून सुरुवात केली. सन 1946 मध्ये ऑस्ट्रेलिया येथील जॉईंट चीफ स्टाफ या जागतिक संघटनेमध्ये भारताच्या हवाईदलाचे प्रतिनिधीत्व केले. भारतीय वायुदलात केलेल्या कामगिरीबद्दल त्यांना जानेवारी 1976 मध्ये भारत सरकारने "पद्मविभूषण"पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. तसेच त्यांना 1968 मध्ये वायुसेवादलाचे परम विशिष्ट सेवा मेडल, सन 1988 मध्ये शिरोमणी पुरस्कार, सन 1991 मध्ये राजीव रत्न पुरस्कार तसेच नॅशनल सिक्युरिटी पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात आला होता. त्यांनी लिहिलेले "मेमरीज: स्वीट ॲन्ड सोअर" हे त्यांचे आत्मचरित्र खूप गाजले होते.

कै.मेहरा यांनी 3 नोव्हेंबर, 1980 ते 5 मार्च, 1982 या कालावधीत महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तर 6 मार्च 1982 ते 4 मार्च, 1985 या काळात राजस्थान राज्याचे राज्यपाल पद भूषविले होते. एक अभ्यासू, कार्यक्षम व कुशल प्रशासक अशीच त्यांची प्रतिमा होती.

अशा या ज्येष्ठ प्रशासकाचे रविवार, दिनांक 8 नोव्हेंबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी माझ्या व पक्षाच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली व्यक्त करतो.

डॉ.सय्यद अहमद यांचा जन्म दिनांक 9 मार्च, 1949 रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., पीएच.डी.पर्यंत झाले होते.

डॉ.सय्यद अहमद हे मंत्री असताना त्यांचा आणि माझा अनेकदा संबंध आला. ते अतिशय मनमिळावू होते. डॉ.सय्यद अहमद यांनी अखिल भारतीय मुस्लिम युवक आघाडीचे उपाध्यक्ष, अखिल भारतीय हज कमिटीचे सदस्य, सेंट्रल गव्हर्नमेंट हज डेलिगेशन सदस्य, महाराष्ट्र राज्य हज कमिटीचे चेअरमन अशा विविध पदांवर त्यांनी उत्तम काम केलेले आहे.

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

डॉ.सय्यद अहमद हे सन 1980, 1985, 1999 व 2004 असे पाच वेळा मुंबईतील नागपाडा मतदासंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी मार्च 1986 ते जून 1988 या काळात गृहनिर्माण, पर्यावरण व औकाफ खात्याचे तर जानेवारी 1991 ते जून 1991 या काळात ऊर्जा, पर्यावरण, वस्त्रोद्योग व औकाफ या खात्याचे राज्यमंत्री तसेच मार्च 2001 ते ऑक्टोबर, 2004 या काळात गृहनिर्माण, गलिच्छवस्ती सुधार, घरदुरूस्ती व पुनर्बांधणी आणि औकाफ खात्याचे मंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले होते. एक उत्कृष्ट संसदपटू आणि अभ्यासू नेता आपल्यातून निघून गेलेला आहे. मी त्यांना माझ्या व पक्षाच्या वतीने भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

कै.रामचंद्र गणेश कापसे यांचा जन्म दिनांक 1 डिसेंबर, 1933 रोजी नाशिक येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., एलएल.बी.पर्यंत झाले होते.

कै.कापसे यांनी सन 1959 ते 1985 या कालावधीत मुंबई येथील रुपारेल महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरी केली होती. कल्याण येथील स्त्री शिक्षण मंडळ, सरस्वती सार्वजनिक मंडळ व डोंबिवली येथील हनुमान सेवा संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले होते. एवढेच नव्हे तर त्यांनी पुढे जाऊन "भारतीय साहित्य शास्त्र" व "लेंटिन आयोग"ही पुस्तके देखील लिहिली. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांवर खूप ऊहापोह झाला होता.

कै.कापसे 1978, 1980 व 1985 असे तीन वेळा ठाणे जिल्ह्यातील कल्याण मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी विधानमंडळाच्या अनेक समित्यांवर उत्तम काम केले होते. एक उत्तम वक्ता, उत्तम संसदपटू, अभ्यासू लोकप्रतिनिधी अशी त्यांची ख्याती होती. त्यांनी वाडा व मोखाडा तालुक्यामध्ये आदिवासींसाठी केलेले काम खूप उल्लेखनीय आहे.

अशा या कुशल नेत्याचे मंगळवार, दिनांक 29 सप्टेंबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी माझ्या व पक्षाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

कै. प्रमोद भाऊरावजी शेंडे यांचा जन्म 6 एप्रिल, 1940 रोजी धुळे येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.पर्यंत झाले होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

मी पूर्व विदर्भाचा संपर्क प्रमुख असताना त्यांचा आणि माझा खूप जवळचा संबंध आला.

कै.शेंडे यांनी देवळी येथील लोकशिक्षण मंडळाचे चेअरमन, नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी संघाचे अध्यक्ष, वर्धा जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघाचे संस्थापक-संचालक, वर्धा येथील इंदिरा गांधी सहकारी सूतगिरणीचे संस्थापक-अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य स्पिनिंग मिल फेडरेशनचे अध्यक्ष, इंदिरा सहकारी बँकेचे संस्थापक अशा अनेक क्षेत्रामध्ये त्यांनी काम केले. कै.शेंडे हे वर्धा जिल्ह्यातील आरोग्य सेवेबाबत अतिशय आग्रही होते.

कै.शेंडे सन 1978, 1980, 1985, 1995 व 2004 असे सहा वेळा वर्धा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. सन 1999 ते 2009 या कालावधीत त्यांनी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष पदही भूषविले होते. एक कुशल प्रशासक, कार्यक्षम व अभ्यासू लोकप्रतिनिधी अशी त्यांची प्रतिमा होती.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक 14 नोव्हेंबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांना माझ्या व पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.मदन विश्वनाथराव पाटील यांचा जन्म दिनांक 2 डिसेंबर, 1960 रोजी सांगली येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.कॉम.पर्यंत झाले होते.

कै.पाटील यांनी सांगली येथील वसंतदादा दंत महाविद्यालयाचे चेअरमन, विश्व-विजय शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, शिवाजीनगर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, वसंतदादा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशा विविध संस्थांवर त्यांनी आपले मोठे योगदान दिलेले आहे.

कै.पाटील यांनी सांगली जिल्हा परिषदेचे सदस्य, सांगली नगरपालिकेचे नगरसेवक तर काही काळ नगराध्यक्ष पदही भूषविले होते.

कै.पाटील 1996 व 1998 असे दोन वेळा सांगली मतदारसंघातून लोकसभेवर निर्वाचित झाले होते. सन 2000 मध्ये सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून महाराष्ट्र विधानपरिषदेवर तर सन 2004 मध्ये सांगली मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. डिसेंबर, 2008 ते नोव्हेंबर, 2009 या कालावधीत त्यांनी महाराष्ट्र राज्याचे महिला व बालविकास आणि पणन खात्याचे मंत्री म्हणून काम केले होते. ते सभागृहाचे सदस्य असताना त्यांचीशी आमचा अनेकदा संबंध आला. त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय मनमिळाऊ होते.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

अशा या उमद्या अभ्यासू नेत्याचे शुक्रवार, दिनांक 16 ऑक्टोबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले. त्यांना देखील मी भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

कै.सदशिव आबाजी पोळ यांचा जन्म दिनांक 1 जून, 1945 रोजी सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील इजबाब येथे झाला. ते या सभागृहाचे सदस्य होते. त्यांच्याशी देखील आमचा अनेकदा संबंध आला. ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सदस्य होते. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ होता. एक अभ्यासू सदस्य म्हणून त्यांची या सभागृहात ओळख होती. त्यांनी या सभागृहात अनेक विषयांवर भाषणे केलेली आहेत. विशेषत: माण आणि खटाव तालुक्यांच्या प्रश्नाबाबत ते फार आग्रही होते.

कै.पोळ यांनी सन 1967 मध्ये मार्डी ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून आपल्या कार्यास सुरुवात केली. सन 2002 मध्ये ते महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे बुधवार, दिनांक 30 सप्टेंबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले.

वरील सर्व मान्यवरांना त्यांच्या दु:खद निधनाबद्दल माझ्या व शिवसेना पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देऊन, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री.ओम प्रकाश मेहरा, मणिपूर राज्याचे राज्यपाल तसेच माजी वि.स.स. व माजी मंत्री डॉ.सय्यद अहमद, अंदमान व निकोबारचे माजी नायब राज्यपाल व माजी वि.स.स., श्री.रामचंद्र गणेश कापसे, विधानसभेचे माजी उपाध्यक्ष श्री.प्रमोद भाऊराव शेंडे व माजी वि.प.स. व माजी मंत्री श्री. मदन विश्वनाथराव पाटील तसेच श्री.सदाशिवराव आबाजी पोळ, माजी वि.प.स. या सर्व मान्यवरांच्या दु:खद निधनाबदल मी काँग्रेस पक्षातर्फे सुरुवातीलाच त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

महोदय, उपरोक्त सर्व मान्यवरांपैकी महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री.ओम प्रकाश मेहरा सोडले तर उर्वरित चारही मान्यवरांच्या बरोबर मला विधिमंडळात काम करण्याची संधी प्राप्त झालेली आहे. त्यांच्यासोबत काम करताना त्यांच्याशी जवळून संबंध आल्यामुळे मला या शोक प्रस्तावावर बोलताना अतिशय दु:ख होत आहे. श्री.ओम प्रकाश मेहरा हे महाराष्ट्राचे राज्यपाल होते. ते राजकीय क्षेत्रातील नव्हते. मला सभागृहाला सांगावेसे वाटते की, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी पंतप्रधान पद स्वीकारल्यानंतर राजकारणात किंवा प्रशासनात केवळ राजकीय व्यक्तींचा सहभाग असावा असे नाही तर प्रशासकीय सेवेतील, परराष्ट्र सेवेतील किंवा काही तज्ज्ञ व्यक्तींना सुध्दा बरोबर घेऊन आपण राज्य कारभार करावा, हे त्यांचे मत होते. त्यामुळे सर्वात पहिला मान हा महाराष्ट्राचे बॅरिस्टर आप्पासाहेब पंत यांना मिळाला. पंडित जवाहरलाल नेहरु यांनी बॅरिस्टर आप्पासाहेब पंत यांना तिबेटला भारताचे राजदूत म्हणून पाठविले. त्या काळात चायना, तिबेट आणि नेपाळ यांचे संबंध कसे असावेत या बाबतीत त्यांनी उत्तम काम केले आणि त्याच परंपरेतून मेहरा साहेब सुध्दा आपल्या राज्यात आले, याचा मी आवर्जून उल्लेख करतो. या विषयी बोलताना मी महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव श्री.बी.जी.देशमुख यांचा सुध्दा उल्लेख करु इच्छितो. ते भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी होते. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी लोंगोवाल यांच्याबरोबर जो करार केला होता त्या करारामध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. आज भारताचा पूर्व भाग आपल्याला शांत दिसतो त्यामध्ये या अधिकाऱ्यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे मला महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव श्री.आर.डी.प्रधान यांचा सुध्दा उल्लेख करावासा वाटतो. प्रशासकीय अधिकारी, परराष्ट्र सेवेतील अधिकारी हे सुध्दा राजकारणामध्ये उत्तमप्रकारे काम करु शकतात याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे ओम प्रकाश मेहरा साहेब आहेत. सिक्कीम राज्याचे विद्यमान राज्यपाल श्री.श्रीनिवास पाटील यांचे काम अतिशय उत्तम आहे. आम्ही ज्यावेळी सिक्कीम राज्यात गेलो होतो त्यावेळी त्यांनी आम्हाला नत्थुला पॉईंट येथे 15 हजार फूट उंचीवर नेऊन तो भाग दाखविला. मी श्री.ओम प्रकाश मेहरा यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, डॉ.सय्यद अहमद हे शांत व्यक्तिमत्त्व होते. मी त्यांना नेहमी म्हणायचो की, तुमच्याकडे बघितल्यानंतर, जो दे उसका भी भला और जो ना दे उसका भी भला. म्हणजे काम करीत राहणे हा डॉ.सय्यद अहमद यांचा महत्त्वाचा गुण होता. त्यामुळे मी त्यांचा आवर्जून उल्लेख करतो.

सभापती महोदय, रामभाऊ कापसे यांच्या बाबतीत बोलावे तेवढे कमीच आहे. ते एक संयमी नेतृत्व, आदर्श नेतृत्व होते. आता अशा नेतृत्वाची राजकारणात, समाजकारणात कमतरता दिसते. विधानसभेमध्ये रामभाऊ कापसे समोर बसायचे. मी आणि सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे ट्रेझरी बेंचवर बसायचो. समोरच्या बाजूला माननीय श्री.मनोहरराव जोशी, गोपीनाथजी मुंडे, राम नाईक आणि रामभाऊ कापसे बसायचे. ते एखाद्या बाबीला विरोध करण्यासाठी उभे राहिले की पहिली बॅटींग मी आणि श्री.माणिकराव ठाकरे करायचो. महोदय, वक्ते हे अनेक प्रकारचे असू शकतात. आज राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संसदीय अभ्यास वर्गाचे उद्‌घाटन माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केले. त्यांचे आजचे उद्‌घाटनपर भाषण खूपच चांगले झाल्याचे मला समजले. रामभाऊ कापसे यांच्यामध्ये उत्तम भाषण करण्याची लकब होती. ती लकब मला खूप आवडायची. काही वक्ते प्रखर आवाजाने सभा जिंकून नेतात आणि काही वक्ते मात्र आवाजाबरोबरच बॉडी लँग्वेजच्या माध्यमातून सभा जिंकतात. परंतु रामभाऊंच्या बाबतीत सांगायचे झाल्यास त्यांच्याकडे शब्दांची लय होती. कोणता शब्द कधी वापरायचा आणि तो कसा

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

फेकायचा हे रामभाऊ कापसे यांच्याकडूनच शिकून घेतले पाहिजे, अशा प्रकारचे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या सोबत मला काम करण्याची संधी प्राप्त झाली होती. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, श्री.प्रमोद शेंडे साहेबांच्या बाबतीत सांगायचे झाल्यास 1942 नंतर स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. महात्मा गांधींच्या आंदोलनामध्ये ज्या कुटुंबांनी भाग घेतला होता त्यामध्ये श्री.प्रमोद शेंडे यांचे सुध्दा कुटुंब होते. प्रमोद शेंडे यांच्या आजोबांपासून, वडिलांपासून त्यांच्या संपूर्ण कुटुंबाने विनोबा भावेंच्या पवनार आश्रमात किंवा वर्ध्याच्या आश्रमात सहभागी होऊन स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेतला. प्रमोद शेंडे यांचे वडील आमदार होते. त्यांच्या वडिलांचा वसा प्रमोद शेंडे यांनी शेवटपर्यंत जपला. आपल्याला सकृतदर्शनी असे दिसत होते की, प्रमोद शेंडे हे चीडखोर आणि फटकळ बोलणारे आहेत. परंतु ते तसे नव्हते. मी सांगू इच्छितो की, ते मनाने अतिशय प्रेमळ आणि विशेषत: सर्व आमदारांना सोबत घेऊन काम करणारे होते. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची पध्दत होती. सरकारी पक्षात असताना सत्ताधारी आणि विरोधी पक्षाला सोबत घेऊन विधिमंडळाचे कामकाज उरकण्याची हातोटी त्यांच्यामध्ये होती. प्रमोद शेंडे हे विदर्भाच्या प्रश्नाबद्दल अतिशय संवेदनशील होते. विदर्भाच्या विकासाचे महर्षी म्हणून प्रमोद शेंडे यांना ओळखले जायचे. मी श्री.प्रमोद शेंडे यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, श्री.मदन पाटील यांना वसंतदादा पाटील यांच्या कुटुंबाचा वारसा होता. श्री.मदन पाटील यांचे नेतृत्व अगदी प्रखर आणि प्रभावी होते. त्यांचे बोलणे कमी होते, पण कर्तृत्व मात्र जास्त होते. मध्यंतरी सांगली महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. त्यावेळी माननीय श्री.माणिकराव ठाकरे हे काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष होते. त्यांनी मला सांगितले की, तुम्ही सांगलीच्या निवडणुकीवर लक्ष ठेवा. मी महिनाभर सांगलीला मुक्कामी होतो. त्यावेळी माझ्यासोबत सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रूपनवर सुध्दा होते. मला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी निवडणुकीच्या बाबतीत विचारले. मी त्यांना सांगितले की, आम्ही 100 टक्के जिंकणार आणि आम्ही ती निवडणूक जिंकलो. यामागील कारण म्हणजे श्री.मदन पाटील होय. त्यांच्याकडे जनमाणसाची नाडी ओळखण्याची हातोटी होती. ते अतिशय लोकप्रिय आणि मनमिळाऊ होते.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

त्यांचे वडील विष्णूअण्णा पाटील यांच्या बरोबर मला काम करण्याची संधी मिळाली होती. ते कमी बोलणारे होते. वसंतदादा यांच्यासारखे काम करणारे असे त्यांचे नेतृत्व होते. श्री.मदन पाटील यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, श्री.सदाशिव पोळ हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे असले तरी ते कॉंग्रेस पक्षाच्या विचारसरणीचे होते. माननीय श्री.शरद पवार साहेबांवर त्यांची अतूट श्रध्दा होती. ते डॉ.सय्यद अहमद यांच्या सारखेच अतिशय निर्मळ, अतिशय साधे आणि नम्रपणे वागणारे होते. त्यांच्यामध्ये नम्रता हा अतिशय मोठा गुण होता.

सभापती महोदय, मी पुनश्च महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री.ओम प्रकाश मेहरा, मणिपूर राज्याचे राज्यपाल तसेच माजी वि.स.स. व माजी मंत्री डॉ.सय्यद अहमद, अंदमान व निकोबारचे माजी नायब राज्यपाल व माजी वि.स.स., श्री.रामचंद्र गणेश कापसे, विधानसभेचे माजी उपाध्यक्ष श्री.प्रमोद भाऊराव शेंडे व माजी वि.प.स. व माजी मंत्री श्री. मदन विश्वनाथराव पाटील तसेच श्री.सदाशिवराव आबाजी पोळ, माजी वि.प.स., या सर्व मान्यवर नेत्यांच्या दु:खद निधनाबदल कॉंग्रेस पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री.ओम प्रकाश मेहरा, मणिपूर राज्याचे राज्यपाल तसेच माजी वि.स.स. व माजी मंत्री डॉ.सय्यद अहमद, अंदमान व निकोबारचे माजी नायब राज्यपाल व माजी वि.स.स., श्री.रामचंद्र गणेश कापसे, विधानसभेचे माजी उपाध्यक्ष श्री.प्रमोद भाऊराव शेंडे व माजी वि.प.स. व माजी मंत्री श्री. मदन विश्वनाथराव पाटील तसेच श्री.सदाशिवराव आबाजी पोळ, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबदल मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देऊन त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, वरील मान्यवरांपैकी श्री.मदन पाटील यांच्या बरोबर माझा विविध संस्थांमध्ये काम करीत असताना संबंध आला. श्री.मदन पाटील यांनी राज्यसभा सोडून इतर सर्व वैधानिक आघाडीच्या सभागृहांमध्ये काम केले. राज्यसभा वगळता विधानसभा, विधानपरिषद आणि लोकसभा या सभागृहांमध्ये त्यांनी काम केले. राज्य पातळीवरील सर्व संस्थांमध्ये सुध्दा त्यांनी काम केलेले आहे. राज्य बँक, मार्केटींग फेडरेशन, हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष असताना त्यांची सहकाराबद्दल अभ्यास करण्याची छाप माझ्यावर पडली. त्यामुळेच त्यांची आणि माझी कायमची मैत्री राहिली.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

सभापती महोदय, मदन पाटील व विष्णू अण्णा यांच्या बरोबर मी विविध संस्थांमध्ये काम केले. त्यावेळी विष्णू अण्णा यांच्याबरोबर मदन पाटील यायचे. विविध संस्थांमध्ये बैठकांपूर्वी चर्चा व्हायची, त्यावेळी एका वेगळ्या आत्मियतेने अभ्यास करण्याची वृत्ती त्यांच्याकडे होती. मदन पाटील चर्चा करताना, बसताना शांत वाटायचे. परंतु ते भाषण करायला, चर्चेमध्ये भाग घ्यायला लागले की, एकदम आक्रमक असायचे. ते संयमीही होते. मिश्किलपणे बोलण्याची त्यांची वेगळी अशी हातोटी होती. वसंत दादांच्या नंतर त्या गराड्यामध्ये तेही दिसायचे. विष्णू अण्णा हे देखील शांत स्वभावाचे होते. मदन पाटील यांनी राजकारणात एक वेगळी छाप पाडली. त्यांनी पहिली छाप सांगली नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये पाडली. सांगली महानगपालिका झाल्यावर त्यांनी महानगरपालिका ताब्यात घेण्याचे काम केले. वेगळ्या तऱ्हेचे त्यांनी काम केले. दुर्दैवाने लहान वयातच त्यांना आजाराने ग्रासले. त्यामुळे त्यांची बाकीच्या संस्थांवर जी पकड होती ती शेवटच्या टप्प्यात त्यांच्याकडून निघून गेली. शेतकरी बाजार असो, वसंत दादा बँक असो त्यांना त्यासाठी शारीरिक साथ मिळाली नाही. आपण त्यांच्याकडे अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून पाहू शकतो. मी मदन पाटील व इतर सदस्यांना माझ्या पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रभाकर घार्गे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सदनाच्या नेत्यांनी शोक प्रस्ताव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. ओम प्रकाश मेहरा, मणिपूर राज्याचे राज्यपाल तसेच माजी वि.स.स. व माजी मंत्री डॉ. सय्यद अहमद, अंदमान व निकोबारचे माजी नायब राज्यपाल व माजी वि.स.स. श्री. रामचंद्र गणेश कापसे, विधानसभेचे माजी उपाध्यक्ष श्री. प्रमोद भाऊरावजी शेंडे, माजी वि.प.स. व माजी मंत्री श्री. मदन विश्वनाथराव पाटील, श्री. सदाशिवराव आबाजी पोळ, माजी वि.प.स. यांना मी माझ्या व सातारा-सांगली जिल्ह्याच्या वतीने शोक भावना व्यक्त करतो.

आताच अनेकांनी सांगितल्याप्रमाणे, माझ्याही सार्वजनिक जीवनात काम करताना माननीय श्री. मदन पाटील यांच्याशी माझा संबंध आला. सांगली जिल्ह्यात अनेक संस्थांशी त्यांचा संबंध होता. माननीय वसंत दादाचा त्यांना वारसा होता. मात्र तरी सुध्दा त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय वेगळे होते. आताच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील साहेबांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे वय कमी असले तरी सुध्दा अनेक क्षेत्रात त्यांनी काम केले. त्यांना खासदार म्हणून दोन वेळा संधी मिळाली. विधानपरिषदेचे सदस्य म्हणून सातारा-सांगली मतदारसंघातून, ज्या क्षेत्राचे प्रतिनिधी मी करतो, तेथूनही त्यांनी काम केले. ते विधानसभा सदस्य होते. सांगली जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रात म्हणजे सांगली शेतकरी सहकारी बँक असेल, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक असेल, विशेष करून सांगली महानगरपालिका असेल तेथे त्यांनी काम केले. सांगली शहराचा विकास करण्यामध्ये त्यांचा फार मोठा, सिंहाचा वाटा होता. पाटील कुटुंबीयांत त्याचे व्यक्तिमत्व मोठे व वेगळे होते. ते धाडसी स्वभावाचे होते. वयाने मोठ्या, लहान तरुणांचे चांगले संघटन करणारे कुशल संघटक म्हणून सांगली जिल्ह्यात त्यांचे नाव घेतले जात होते. सांगलीच्या राजकारणात सन्माननीय आर.आर.आबांनंतर समाजात काम करणाऱ्या व्यक्तींपैकी श्री. मदन पाटील हे होते, त्यांचे निधन झाले आहे. सांगलीच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांच्या जाण्याने पोकळी निर्माण झाली आहे, त्यांना मी माझ्या भावपूर्ण श्रध्दांजली व्यक्त करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रभाकर घार्गे ....

सभापती महोदय, माझ्या तालुक्यातील, विधानसभा मतदारसंघातील श्री. सदाशिवराव पोळ यांचेही 30 सप्टेंबरला दु:खद निधन झाले. त्यांनी 50 वर्षे समाजिक व राजकीय क्षेत्रात काम केले. मार्डी गावचे सरपंच, पंचायत समितीचे सभापती म्हणून त्यांनी 21 वर्षे काम केले. सातारा जिल्हा परिषदेत 35 वर्षे जिल्हा परिषदेचे सदस्य, उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेत प्रदीर्घ काळ म्हणजे 42 वर्षे त्यांनी बँकेचे, सोसायटीचे प्रतिनिधीत्व केले. ते या बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष होते. योगायोगने बँकेत त्यांच्याबरोबर 15 वर्षे काम करण्याची संधी मिळाली. ते सर्वसामान्यांचे नेते होते. समाजातील लोकांचे कायमचे ऋण असल्याप्रमाणे दिवसातील 10-15 तास त्यांनी लोकांबरोबर काम केले. मला त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या 50 वर्षांच्या काळात एखाद्याच्या लग्नाला उपस्थित राहण्याच्या संख्येचा आणि मृत्यू झाल्यानंतर कुटुंबाला भेट देण्याच्या संख्येचा विचार केला तर आपल्याला त्यांची नोंद गिनिज बूकमध्ये घ्यावी लागेल, एवढे ते लोकांना भेटत होते. कारण त्यांच्या काळात तो मतदारसंघ राखीव होता. पंचायत समिती, जिल्हा परिषदेमध्ये तालुक्याचे नेतृत्व करीत असताना ते सांगतील ती माणसे असे 5 आमदार महाराष्ट्र विधानमंडळाला त्यांनी दिली. राज्यातील अशा थोर नेत्याचे निधन झाले आहे, त्यांना मी माझ्या भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभागृहाच्या सन्माननीय नेत्यांनी महाराष्ट्राचे माजी राज्यपाल सन्माननीय ओम प्रकाश मेहरा साहेब, मणिपूर राज्याचे राज्यपाल तसेच माजी वि.स.स. व माजी मंत्री सन्माननीय डॉ. सय्यद अहमद साहेब, अंदमान व निकोबारचे माजी नायब राज्यपाल व माजी वि.स.स. सन्माननीय रामभाऊ गणेश कापसे, विधानसभेचे माजी उपाध्यक्ष सन्माननीय श्री. प्रमोदजी शेंडे, माजी वि.प.स. व माजी मंत्री श्री. मदन पाटील साहेब, सन्माननीय श्री. सदाशिवराव आबाजी पोळ, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव सभागृहात मांडला आहे, त्याचे समर्थ करण्यासाठी आणि माझ्या पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे साहेबांनी सांगितले की, राजकारणाव्यतिरिक्त जी माणसे असतात, देशाच्या समाज व्यवस्थेमध्ये, राज्य व्यवस्थेमध्ये व नैतिक व्यवस्थेमध्ये ज्यांची गरज असते, अशा लोकांना राजकारणात संधी मिळते, तेव्हा ते आपली कर्तबगारी दाखवितात, अत्युच्च कर्तबगारी दाखवितात, अशांपैकी उल्लेखनीय उदाहरण म्हणजे भारतीय हवाई सेवेतून आलेले कॅप्टन पायलट असलेले सन्माननीय ओम प्रकाश मेहरा यांचे आहे, आपल्याला जरूर त्यांचा उल्लेख करावा लाकेल. त्यांनी पायलट म्हणून हवाई दलात सुरूवात केली आणि एक एक टप्पा काबीज करत ते भारतीय वायू दलाचे एअर व्हाईस मार्शल झाले. महत्त्वाची बाब म्हणजे सन 1965 च्या भारत व पाकिस्तान यांच्या युध्दात त्यांनी अत्यंत उल्लेखनीय कामगिरी केली. देशाच्या इतिहासात त्यांचे नाव निश्चितपणे नोंदले जाईल. त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांना 'पद्मविभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वायू सेवा दलाचे परम विशिष्ट सेवा मेडल देखील त्यांना प्रदान करण्यात आले. 'राजीवरत्न' पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. नॅशनल सिक्युरिटी पुरस्काराने त्यावेळी त्यांना सन्मानित करण्यात आले. या व्यतिरिक्त ऑलिम्पिक कौन्सिलमध्ये देखील एशियाचे ते अध्यक्ष होते. एशिअन गेम फेडरेशनमध्ये अध्यक्ष म्हणून उत्तम प्रकारचे काम त्यांनी केले. त्यांनी एक सुंदर असे पुस्तक, आत्मचिरत्र लिहिले. "मेमरिज : स्वीट ॲण्ड सोअर" हे त्यांचे अत्यंत गाजलेले चरित्र आहे. आपल्या राज्याचे राज्यपाल पदही त्यांनी भूषविले होते. तसेच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

राजस्थान राज्याचे राज्यपाल पदही त्यांनी भूषविले होते. एक अत्यंत अभ्यासू, शिस्तीचा भोक्ता असलेला, सैनिकी बाणा असलेला कार्यक्षम, कुशल प्रशासक अशी त्यांची प्रतिमा होती. त्यांच्या निधनाबद्दल मी त्यांच्या स्मृतीस आदरांजली अर्पण करतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

सभापती महोदय, सन्माननीय डॉ.सय्यद अहमद हे आपल्या सभागृहाचे सदस्य होते. त्यांचे कर्तुत्व असे की, मुंबईतील नागपाडा मतदारसंघातून ते पाच वेळा निवडून आले होते. त्यांनी राज्यमंत्री आणि मंत्री म्हणून देखील या राज्याची धुरा वाहिली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी सांगितल्याप्रमाणे सभागृहात ते अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत असत. सभागृहात एखादा मुद्दा जर स्पष्ट होत नसेल, उत्तराने समाधान होत नसेल तर ते स्वतःच्या दालनात संबंधित सन्माननीय सदस्यांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करीत असत आणि तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असत, अशी त्यांची कामाची एक वेगळी हातोटी होती. त्यांनी गृहनिर्माण, पर्यावरण, औकाफ, गलिच्छ वस्ती सुधार, घर दुरूस्ती व पुनर्बांधणी या खात्यांचे मंत्री म्हणून देखील काम पाहिलेले आहे. नंतरच्या कालावधीत झारखंड आणि त्यानंतर मणिपूर राज्याचे राज्यपाल म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. एक संयमी, मनमिळावू, अभ्यासू संसदपटू असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. मी मरहूम डॉ.सय्यद अहमद यांच्या स्मृतीस श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, माननीय श्री.रामभाऊ कापसे यांचे वर्णन अनेक सन्माननीय सदस्यांनी अत्यंत कर्तबगार व्यक्ती म्हणून केले आहे व ते रास्तही आहे. त्यांची 'भारतीय साहित्य शास्त्र' व 'लेंटिन आयोग' ही पुस्तके फार गाजली होती. अशा प्रकारे राजकारणात असूनही त्यांचा साहित्याशी जवळचा संबंध होता.

सभापती महोदय, कल्याण महानगरपालिकेचे नगरसेवक, नगरपालिकेच्या पाणी पुरवठा समितीचे सभापती, सिडकोचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. भारतीय जनता पक्ष अस्तित्वात नव्हता तेव्हा जनसंघाचे ते निष्ठावान कार्यकर्ते होते आणि त्यानंतर भारतीय जनता पक्षाचे ते निष्ठावान कार्यकर्ते झाले. ठाणे जिल्ह्यातील कल्याण मतदारसंघातून ते 3 वेळा विधानसभेवर निवडून आले. एक अत्यंत अभ्यासू, चिंतनशील आणि जनतेच्या भावनांचा सन्मान करणारे असे त्यांचे नेतृत्व होते. ते लोकसभेवर आणि राज्यसभेवर देखील निवडून गेले होते. अंदमान-निकोबार या राज्याचे नायब राज्यपाल पद देखील त्यांनी भूषविले होते. उत्तम वक्ता, उत्कृष्ट संसदपटू, अभ्यासू लोकप्रतिनिधी, आदर्श राजकारणी आणि अजातशत्रु असलेले माननीय

....2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

श्री.रामभाऊ कापसे हे जरी भारतीय जनता पक्षात असले तरी सर्व पक्षातील लोकांशी त्यांचे प्रेमाचे संबंध होते, हे आम्ही कधीही विसरु शकणार नाही. सर्वसामान्य जनतेसाठी तळमळीने काम करणारे एक कुशल नेतृत्व आज आपल्यातून निघून गेले आहे. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, माननीय श्री.प्रमोद शेंडे हे विधानसभेचे उपाध्यक्ष होते. शैक्षणिक संस्था, शैक्षणिक चळवळ, सहकार, कृषी आणि कामगार अशा विविध क्षेत्रांशी त्यांचा संबंध होता. नो-इंडस्ट्रिज डिस्ट्रिक्ट असूनही वर्धा जिल्ह्यात त्यांनी विकासाची गंगा आणली, हे वर्धा जिल्ह्यातील जनता विसरु शकणार नाही. वर्धा जिल्ह्यात पवनार येथे विनोबा भावेंचा आश्रम आहे, सेवाग्राम येथे बाबुजींची कुटी आहे, हा आणि स्वातंत्र्यलढ्याचा वारसा या जिल्ह्याला लाभला होता. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे ते निष्ठावान कार्यकर्ते होते. महत्वाची बाब ही की, वर्धा जिल्ह्यातून ते सहा वेळा विधानसभेवर निवडून आले होते. काही काळ त्यांनी राज्य मंत्रिमंडळात राज्यमंत्री म्हणून देखील काम केले आहे. नंतर त्यांना विधानसभेच्या उपाध्यक्ष पदावर काम करण्याची संधी मिळाली. एक कुशल प्रशासक, कार्यक्षम लोकप्रतिनिधी, अशी त्यांची प्रतिमा होती.

सभापती महोदय, मी एक प्रसंग कधीही विसरु शकणार नाही. मी लोकसभेवर निवडून गेल्यानंतर वर्धा जिल्ह्यातील जनतेने माझा वर्धा येथील स्टेडियमवर सत्कार ठेवला होता. या प्रसंगी माझी नाणेतुला देखील करण्यात आली. सन्माननीय श्री.दत्ता मेघेजी हे देखील उपस्थित होते आणि माननीय श्री.प्रमोदजी शेंडे यांच्या हस्ते माझा सत्कार करण्यात आला. ही आठवण मी कधीही विसरु शकणार नाही. लोकनेते श्री.प्रमोदजी शेंडे यांच्या निधनाबद्दल मी त्यांच्या स्मृतीस श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, सन्माननीय श्री.मदन पाटील यांचा आणि माझा संबंध निवडणुकीच्या काळात आला होता. माननीय कै.वसंतदादा पाटील, माननीय कै.विष्णु अण्णा पाटील, स्वातंत्र्य चळवळ अशी थोर परंपरा त्यांना लाभली होती. नगरपरिषद, महानगरपालिका, जिल्हा परिषद अशी टप्प्याटप्प्याने प्रगती करीत त्यांनी आपल्या कर्तबगारीने सहकार, उद्योग, कृषी, शिक्षण अशा अनेक क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटविला होता. वसंतराव दादा सहकारी साखर

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.........

कारखान्याचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी अतिशय चांगले काम केले आहे, हे सांगलीतील जनता कधीही विसरु शकणार नाही. शैक्षणिक, सामाजिक आणि सहकारी संस्थांशी त्यांचा जवळचा संबंध होता. निवडणुकीच्या काळात आम्ही सोबत होतो आणि त्या काळात मला त्यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय झाला. कितीही त्रास झाला, संकटे आली, कोणी काहीही बोलले तरी संयमाने ते त्याचा सामना करीत असत. ते दोन वेळा सांगली लोकसभा मतदारसंघातून लोकसभेवर आणि त्यानंतर विधानपरिषद, विधानसभेवर निर्वाचित झाले होते. सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणारे श्री.मदन पाटील यांचे दुःखद निधन झाले आहे. मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, सन्माननीय श्री.सदाशिवराव पोळ यांच्या कर्तुत्वाबद्दल आपण सर्वांनीच चर्चा केली आहे. माण तालुक्यातील शैक्षणिक आणि सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. त्यांचे शिक्षण एफ.वाय.बी.एस्सी.(ॲग्रिकल्चर) पर्यंत झाले होते. सहकार आणि कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग करण्याच्या बाबतीत ते नेहमीच सतर्क असायचे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ते निष्ठावान कार्यकर्ते होते. देशाचे लोकनेते श्री.शरदचंद्रजी पवार यांच्यावर त्यांची अतुट श्रध्दा होती. सन्माननीय श्री.सदाशिवराव पोळ हे विधानसभा आणि विधानपरिषद अशा दोन्ही सभागृहाचे सदस्य होते. त्यांनी आपल्या कार्यातून एक कार्यक्षम, अभ्यासू लोकप्रतिनिधी म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली होती आणि आपल्या कार्याचा ठसा उमटविला होता. त्यांच्या निधनाबद्दल मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभागृहाचे नेते माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथरावजी खडसे यांनी जो शोकप्रस्ताव सभागृहात मांडला आहे, त्याला पाठिंबा देतो आणि थांबतो.

-------------

यानंतर श्री.बोरले.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** सभागृहाचे नेते नामदार श्री.एकनाथरावजी खडसे यांनी महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री.ओम प्रकाश मेहरा, मणिपूर राज्याचे राज्यपाल तसेच माजी वि.स.स. व माजी मंत्री डॉ.सय्यद अहमद, अंदमान व निकोबारचे माजी नायब राज्यपाल व माजी वि.स.स. श्री.रामचंद्र गणेश कापसे, विधानसभेचे माजी उपाध्यक्ष श्री.प्रमोद भाऊरावजी शेंडे, माजी वि.प.स व माजी मंत्री श्री.मदन विश्वनाथराव पाटील, तसेच श्री.सदाशिवराव आबाजी पोळ, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे. त्यावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे व इतर सर्व सन्माननीय गटनेते तसेच, सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

कै.ओम प्रकाश मेहरा यांनी सन 1940 मध्ये भारतीय हवाई दलाच्या सेवेत पायलट ऑफिसर म्हणून सुरुवात केली. सन 1947 मध्ये त्यांना विंग कमांडर तसेच, सन 1960 ते 1963 मध्ये इन्स्टिट्युट ऑफ आर्ट मॅनेजमेंट टेक्नॉलॉजी, पुणेचे डीन तसेच, हवाई दलाच्या नागपूर येथील मेंटेनन्स कमांडचे प्रमुख म्हणूनही त्यांनी उत्तम कार्य केले होते. सन 1963 मध्ये त्यांची भारतीय वायुदलाच्या एअर व्हाईस मार्शल पदावर निवड झाली होती. त्यांनी 1965 च्या भारत-पाकिस्तान युध्दात उल्लेखनीय कामगिरी केली होती. सन 1968 मध्ये त्यांना एअर मार्शलपदी बढती मिळाली. सन 1973 ते 1976 मध्ये त्यांनी भारताचे चीफ एअर मार्शल म्हणून उत्तम कार्य केले होते. त्यांनी भारतीय वायुदलात केलेल्या कामगिरीबद्दल त्यांना जानेवारी 1976 मध्ये भारत सरकारने "पद्मविभूषण" पुरस्कार तसेच, अनेक पुरस्कार देवून त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. कै.मेहरा यांनी भारतीय वायुदलातील सेवेनंतर 1976 ते 1982 पर्यंत भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष, ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशियाचे अध्यक्ष तसेच, सन 1978 ते 1980 पर्यंत एशियन गेम्स फेडरेशनचे अध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले होते.

कै.मेहरा यांनी 3 नोव्हेंबर, 1980 ते 5 मार्च, 1982 या कालावधीत महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तर 6 मार्च 1982 ते 4 मार्च, 1985 या काळात राजस्थान राज्याचे राज्यपालपदही भूषविले होते. एक अभ्यासू, कार्यक्षम व कुशल प्रशासक, वायुदलातील श्रेष्ठ अधिकारी अशी त्यांची प्रतिमा होती.

अशा या ज्येष्ठ प्रशासकाचे रविवार, दिनांक 8 नोव्हेंबर 2015 रोजी दु:खद निधन झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2...

**सभापती.......**

डॉ.सय्यद अहमद यांनी अखिल भारतीय मुस्लिम युवक आघाडीचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हज कमिटीचे चेअरमन, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक सेलचे अध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले होते. ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

डॉ.सय्यद अहमद सन 1980, 1985, 1990, 1999 व 2004 असे पाच वेळा मुंबईतील नागपाडा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी मार्च 1986 ते जून 1988 व जानेवारी 1991 ते जून 1991 या काळात विविध खात्याचे राज्यमंत्री तसेच, मार्च 2001 ते ऑक्टोबर 2004 या काळात गृहनिर्माण, गलिच्छवस्ती सुधार, घरदुरुस्ती व पुनर्बांधणी आणि औकाफ खात्याचे मंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले होते. तसेच, सन 2011 ते 2015 या काळात झारखंड राज्याचे राज्यपाल तर दिनांक 16 मे, 2015 पासून मणिपूर राज्याचे राज्यपाल पदही त्यांनी भूषविले होते. मणिपूर राज्याचे राज्यपाल म्हणून कार्यरत असतानाच त्यांचे रविवार, दिनांक 27 सप्टेंबर 2015 रोजी दु:खद निधन झाले आहे.

कै.राम कापसे यांनी सन 1959 ते 1985 या कालावधीत मुंबई येथील रुपारेल महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सेवा केली होती. कै.कापसे यांनी कल्याण महानगरपालिकेचे नगरसेवक, कल्याण महानगरपालिका पाणी पुरवठा समितीचे सभापती, तसेच सिडकोचे अध्यक्ष म्हणूनही उत्तम कार्य केले होते. ते जनसंघाचे व भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

कै.कापसे 1978, 1980 व 1985 असे तीन वेळा ठाणे जिल्ह्यातील कल्याण मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. एक अभ्यासू लोकप्रतिनिधी अशीच त्यांची प्रतिमा होती. ते सन 1989 व 1991 मध्ये दोन वेळा ठाणे मतदारसंघातून लोकसभेवर तर सन 1996 मध्ये राज्यसभेवरही निर्वाचित झाले होते. तसेच, त्यांनी सन 2004 ते 2006 या काळात अंदमान निकोबारचे नायब राज्यपालपदही भूषविले होते. त्सुनामी सारख्या अवघड नैसर्गिक संकटात त्यांनी केलेले कार्य कायम स्वरुपी आपल्या सर्वांच्या लक्षात राहील, ही वस्तुस्थिती आहे.

अशा या उत्तम वक्ता, उत्कृष्ट संसदपटू, अभ्यासू लोकप्रतिनिधी, आदर्श राजकारणी, सर्व सामान्यांसाठी तळमळीने कार्य करणाऱ्या कुशल नेत्याचे मंगळवार, दिनांक 29 सप्टेंबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती.......**

कै.प्रमोद शेंडे यांनी वर्धा येथील इंदिरा गांधी सहकारी सुतगिरणीचे संस्थापक-अध्यक्ष, इंदिरा सहकारी बँकेचे संस्थापक-अध्यक्ष म्हणून कार्य केले होते. वर्धा जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थाशी त्यांचा निकटचा संबंध होता. वर्धा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते. ते कॉंग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. ते सहा वेळा वर्धा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी जून, 1988 ते मार्च, 1990 या काळात महाराष्ट्र राज्याचे कृषी व लाभक्षेत्र विकास खात्याचे राज्यमंत्री म्हणूनही उत्तम कार्य केले होते. तसेच, त्यांनी सन 1999 ते 2009 या कालावधीत दोन वेळा महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष पदही भूषविले होते. एक कुशल प्रशासक, कार्यक्षम व अभ्यासू लोकप्रतिनिधी अशीच त्यांची प्रतिमा होती.

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक 14 नोव्हेंबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले आहे.

कै.मदन पाटील यांनी विश्वनाथराव शामराव पाटील ट्रस्टचे संस्थापक-अध्यक्ष, वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेचे चेअरमन, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक, तसेच वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणूनही उत्तम कार्य केले होते. सांगली जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. त्यांच्या विधान परिषद निवडणुकीच्या वेळी मी स्वत: भाग घेतला होता. ते दोन वेळा सांगली मतदारसंघातून लोकसभेवर निर्वाचित झाले होते. पश्चिम महाराष्ट्रातील अशा सुशील नेतृत्वाचे शुक्रवार, दिनांक 16 ऑक्टोबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले आहे.

कै.सदाशिवराव पोळ यांनी शिंगणापूर येथील पंचक्रोशी शिक्षण मंडळाचे चेअरमन, मार्डी येथील आबासाहेब पोळ शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष, दहिवडी येथील साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे 42 वर्षे संचालक तर काही काळ अध्यक्ष तसेच, माण तालुका खरेदी विक्रीसंघाचे चेअरमन, माण तालुका सहकारी सूतगिरणीचे संस्थापक-चेअरमन म्हणूनही उत्तम कार्य केले होते. सतत दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या माण

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती.......**

तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते. ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

अशा या ज्येष्ठ समाज सेवकाचे बुधवार, दिनांक 30 सप्टेंबर, 2015 रोजी दु:खद निधन झाले आहे.

मी सभागृहाला सांगू इच्छितो की, पूर्वी माझ्या तालुक्यातील 36 गावे माण मतदारसंघात होती. माण मतदारसंघ मागासवर्गीय मतदारसंघ म्हणून गणला गेला होता. कै.सदाशिव पोळ यांचे व माझे राजकीय संबंध अत्यंत चांगले होते. त्यांच्या निधनानंतर देखील त्यांच्या कुटुंबाशी माझे घरगुती संबंध कायम स्वरुपी राहणार आहेत.

सर्व दिवंगतांच्या स्मृतीस मी अभिवादन करतो व भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती.......**

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 8 डिसेंबर, 2015 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 19 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 8 डिसेंबर, 2015 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही